क्र. /एमआयटीएल/ पीएपी / २०२६ /२५

दि. १५/०७/२०२६

संदर्भ : पीएपी धोरण आणि परिपत्रकानुसार भूखंड वितरण, संदर्भ क्र. सीएन/०१/भूखंड/२०२१ दिनांक २५ मार्च, २०२१.

----

## प्रकल्पग्रस्त व्यक्तींना भूखंड वाटपाच्या मार्गदर्शक सूचना

MITL मार्फत प्रकल्पग्रस्त व्यक्तींना २०२१ च्या धोरणानुसार भूखंड वाटपाची कार्यपद्धती अवलंबण्यात येत असून सदर धोरणानुसार प्रकल्पग्रस्तांकडून अर्ज मागविण्यात आले असून अर्जाची तपासणी करून देकारपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच ज्या प्रकल्पग्रस्तांनी देकारपत्र प्राप्त झाल्यानंतर EMD ची रक्कम भरली असेल, त्यांना भूखंड निश्चित करून वाटप पत्र देण्यात येईल.

प्रकल्पग्रस्त भूखंड धोरण २०२१ च्या कलम ११ नुसार प्रकल्पग्रस्त व्यक्तींनी मागणी केल्यानुसार सदर व्यक्तीस त्यास देय असलेल्या क्षेत्रा इतका भूखंड देता येत नसल्यास त्या क्षेत्राच्या जवळच्या आकाराचा भूखंड देता येईल. तसेच एका भूखंडास एकापेक्षा अधिक प्रकल्पग्रस्तांनी मागणी केल्यास लॉटरी पद्धतीने भूखंड वाटप करण्यात यावे. तसेच प्रकल्पग्रस्तांना शक्यतो ज्या गावातील जमीन संपादित झाली असेल त्या गाव क्षेत्रातील भूखंड देण्यात यावे असे नमूद आहे.

मोठ्या प्रमाणात प्रकल्पग्रस्तांची मागणी आली आहे. मागणी करणाऱ्या प्रकल्पग्रस्त व्यक्तींची संख्या बघता व भूखंड वाटपामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी भूखंड वाटप हे ऑनलाईन पद्धतीने करण्यासाठी संगणकीय प्रणाली मार्फत (automization) ऑनलाईन प्रणालीचा वापर करण्यात येईल.

सदर ऑनलाईन प्रणालीची कार्यपद्धती खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे:

१) प्रथमतः प्रकल्पग्रस्तांसाठी MITL च्या वेबसाईटवर भूखंड निवडण्यासाठी पोर्टल उपलब्ध करून देण्यात येईल.

२) प्रत्येक प्रकल्पग्रस्त अर्जदारांना त्यांना देण्यात आलेल्या UID (AURIC ID) प्रमाणे सदर पोर्टलवर लॉगिन करता येईल.

३) प्रकल्पग्रस्त अर्जदार लॉगिन झाल्यानंतर त्यास त्याला मिळू शकतील अशा भूखंडांचे पसंती क्रम उपलब्ध होतील. सदर भूखंडांचे क्षेत्र हे त्यांना अनुज्ञेय असलेल्या क्षेत्रा इतके राहील किंवा म.औ.व.म., पीएपी (PAP) ला पात्र आकाराचा भुखंड वाटप करण्याचा प्रयत्न करेल. परंतु नियोजनाच्या (Planning) कारणामुळे जर तंतोतंत आकाराचा भुखंड देणे शक्य झाले नाही तर म.औ.व.म. प्रकल्पग्रस्ताला त्याच्या सर्वात जवळचा कमी आकाराचा भुखंड उपलब्ध करून देईल.

४) सदर अर्जदारास उपलब्ध भूखंडांपैकी प्रत्येक भूखंडास प्रथम, द्वितीय, तृतीय इत्यादी या क्रमांकाने पसंती क्रम द्यावे लागेल.

५) अर्जदाराने भूखंड पसंती क्रम देण्यासाठीची सुविधा ही पोर्टल उपलब्ध करून दिलेल्या दिनांकापासून ७ दिवस

राहणार असून त्यानंतर ही सुविधा त्या भूखंड पसंती सायकलसाठी बंद होईल.

६) अर्जदाराला पोर्टल ज्या दिवशी उपलब्ध होईल त्याच्या २४ तास अगोदर एसएमएस, मॅसेज आणि ई-मेल पाठविण्यात येईल.

७) अर्जदाराने ७ दिवसात भूखंड पसंती न केल्यास त्याला पुढील पसंती क्रम सायकलमध्ये ही सुविधा देण्यात येईल.

८) अर्जदाराने निवड केलेल्या भूखंडासाठी दुसऱ्या कुठल्याही व्यक्तीने अर्ज न केल्यास सदरचा भूखंड हा त्या अर्जदारासाठी राखीव ठेवण्यात येईल.

९) जर अर्जदार ह्याने निवड केलेल्या भूखंडासाठी इतर अर्जदारांनी अर्ज केल्यास सदरचा भूखंड हा 'लॉटरी' पद्धतीमध्ये जाईल व त्यानंतर MITL च्या २०२१ च्या धोरणानुसार भूखंडाचे वाटप करण्यात येईल.

१०) अर्जदारास 'लॉटरी' मध्ये भूखंड न मिळाल्यास त्याने दिलेल्या दुसऱ्या पसंती क्रमांकाच्या भूखंडाचा विचार केला जाईल. सदर दुसऱ्या क्रमांकाचा भूखंड उपलब्ध असल्यास त्या भूखंडाबाबत अर्जदाराचा विचार करण्यात येईल व अर्जदार ह्याने एकट्यानेच सदरचा भूखंड मागितला असल्यास तो त्यासाठी राखीव ठेवण्यात येईल. तथापि इतर अर्जदार यांनी मागणी केल्यास सदर भूखंड हा लॉटरी पद्धतीमध्ये जाईल. त्याच पद्धतीने तिसऱ्या व पुढील पसंती क्रमांकाच्या भूखंडासाठी देखील कार्यपद्धती राबविण्यात येईल.

११) अर्जदार यांस त्यांनी पसंती दर्शविलेल्या क्रमांकाचा देखील भूखंड प्राप्त न झाल्यास त्याला पुढील भूखंड निवडीच्या सायकलमध्ये भूखंडाचे विकल्प उपलब्ध करून देण्यात येईल.

१२) ज्या प्रकल्पग्रस्त अर्जदारांनी एकत्रित भूखंडाची मागणी केली आहे, अशा भूखंडांचे एकत्रिकरण नियोजनाच्या दृष्टीने (Planning point of view) तपासणी करून नियोजन विभागामार्फत भूखंडांचे एकत्रीकरण करण्यात येईल व त्यानंतर, असे भूखंड अर्जदारांना निवडीसाठी त्यांच्या लॉगिनवर उपलब्ध करून देण्यात येतील.

१३) एकत्रित भूखंडासाठी देखील वैयक्तिक भूखंडाप्रमाणे निवड सायकल आखून निवड करण्यासाठी भूखंड उपलब्ध करून देण्यात येईल.

१४) निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर भूखंड वाटप समितीने भूखंड वाटपाची कार्यवाही पूर्ण करावी.

१५) कुठलेही प्रकल्पग्रस्त हे भूखंडापासून वंचित राहणार नाही व सर्व भूखंड वाटपाची प्रक्रिया ही पारदर्शकपणे राबविण्याची दक्षता घेण्यात येईल.

(डॉ. मुकेश भोगे),
सह. व्यवस्थापकीय संचालक (विपणन),
महाराष्ट्र औद्योगिक वसाहत मर्यादित (MITL)

**Maharashtra Industrial Township Limited** *(A Govt. Undertaking)*
"Udyog Sarathi", DMIC Cell, Marol Industrial Area Mahakali
Caves Road, Andheri East, Mumbai 400 093
+91 (022) 4749 1921 | www.mitl.org.in | www.auric.city | CIN: U74999MH2014SGC260132